# बोधिसत्व सहकारी रूग्णालय मर्या. पुणे.

नोंदणी क्र.पीएनए / जिउनि (शहर)/जीएनएल / (ओ)/१५७/२०२०-२१/सन-२०२१ दि.२९/९/२०२१

अध्यक्ष : डॉ.मोरेश्वर सुखदेवे

उपाध्यक्ष : डॉ.पी.टी.गायकवाड


जा.क्र.बो धि स रू म / २०२५-२६/३८

दिनांक : २०/०८/२०२५

## बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे

### :: अधिमंडळाची "वार्षिक सभा"सूचना ::

(फक्त सभासदांसाठी)

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे च्या सर्व सन्माननीय सभासदांना सूचना देण्यात येते की,संस्थेची चौथी अधिमंडळाची "वार्षिक सभा",दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ठीक २.३० वाजता. पुणे इंटरनॅशनल स्कूल, टिंगरेनगर, विद्यानगर, लेन नंबर १४ येथे खालील कामकाजाकरिता आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

:: सभेपुढील विषय ::

१. दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या संस्थेच्या तिसऱ्या अधिमंडळाच्या "वार्षिक सभेचा" इतिवृत्तांत कायम करणे.
२. संस्थेच्या ३१ मार्च २०२५ अखेरच्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.
३. ३१ मार्च २०२५ अखेरच्या उत्पन्न व खर्च पत्रक व ताळेबंद पत्रकास मान्यता देणे.
४. ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रकमेचे विनीयोगास मान्यता देणे.
५. ३१ मार्च २०२५ अखेरचे लेखा परीक्षण अहवालाची नोंद घेणे.
६. आधीच्या लेखापरीक्षणाचा दुरुस्ती अहवाल.
७. वार्षिक वर्ष २०२५-२६ च्या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पास मान्यता देणे.
८. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
९. म्हाडा कडून जागेचे आवंटन,निधीचे नियोजन व जागा खरेदीस मान्यता देणे.
१०. संस्थेचे स्वतःचे हॉस्पिटल उभारण्यासाठी चे नियोजन, निधी गोळा करणे. म्हाडाची जागा न मिळाल्यास खुल्या बाजारातून जागा खरेदी करणेस मान्यता देणे
११. संस्थेच्या उपविधीमध्ये करावयाच्या दुरुस्त्यांना मान्यता देणे.
१२. मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने सभेपुढे आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. बोधिसत्व पुणे

डॉ. मोरेश्वर सुखदेवे
अध्यक्ष

विशेष सूचना:-

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर अधिमंडळाची "वार्षिक सभा" त्याच दिवशी वरील ठिकाणी अर्ध्या तासानंतर मूळ विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यासाठी भरेल व त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

२. ज्या सभासदांना अधिमंडळाच्या "वार्षिक सभेच्या" विषय पत्रिकेतील बाबींसंबंधी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी दिनांक २६ ऑगस्ट २०२५ पूर्वी लेखी प्रश्न संस्थेच्या कार्यालयामध्ये किंवा संस्थेच्या Email:bodhisatva29@gmail.com पाठविणे अनिवार्य राहील.

३. संस्थेचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा लेखापरीक्षण अहवाल संस्थेच्या कार्यालयात सभासदांना पाहण्यासाठी उपलब्ध राहील.

४. संस्थेचा ३१ मार्च २०२५ अखेरचा वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके संस्थेच्या Website:http://bsrpune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.